



# पायाभूत सराव पुस्तिका भाग -२

## इयत्ता - ६ वी ते ८ वी

**विद्यार्थी/पालकांनी लक्षात घ्यावयाचे मुद्देः**


* या सराव पुस्तिकेमध्ये एकूण ४८ पाने आहेत, प्रत्येक आठवड्यासाठी चार पाने दिलेली आहेत.
* यामध्ये भाषा या विषयाचा आणि या विषयावर श्रवण, संभाषण, वाचन व लेखन या क्षमतांवर आधारित उपक्रमांचा सराव प्रत्येक आठवड्यात करता येणार आहे.
* विद्यार्थ्यांना उपक्रम करताना काही अडचणी आल्या/काही घटक समजत नसल्यास त्यांना पालकांनी मदत केली पाहिजे.
* एका आठवड्यातील सराव पुर्ण झाल्यावरच पुढील आठवड्याच्या सरावास सुरुवात करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.
* आठवड्याचा सराव पुर्ण झाल्यावर पालकांनी विद्यार्थ्यांसोबत सरावावर चर्चा करावी, आवश्यक तिथे अभिप्राय आणि दिलेल्या रिकाम्या जागेत स्वतःची सही करणे अपेक्षित आहे.
* जर विद्यार्थ्याने इतर कोणाची मदत न घेता सराव पुर्ण केला असेल तर, त्याने स्वतः या शब्दावर (✓) खुण करावी.
* आणि जर विद्यार्थ्याने सरावा दरम्यान इतर कोणाची मदत घेतली असेल तर, त्याने मदत या शब्दावर (✓) खुण करावी.
* एका आठवड्याचा सराव पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्याने मदतीशिवाय केलेल्या एकूण सरावातील घटकातील संख्येशी संबंधित वर्तुळाचा भाग रंगवावा.
* उदाहरणार्थ : तिसऱ्या आठवड्यामध्ये विद्यार्थ्याने २ उपक्रम स्वतः पुर्ण केले आहेत, एक उपक्रम पुर्ण करण्यासाठी इतरांची मदत घेतली आहे आणि एक उपक्रम अपूर्ण आहे. अशा परिस्थितीत शेजारील चित्रात दाखविल्या प्रमाणे प्रमाणपत्रावरील शेवटच्या पानावर माहिती भर.



आठवडा 01

# खालील आकार गिरव.





Sikshana Foundation

स्वत:
Self

मदत
Help

# अक्षर अवयवांचा सराव कर.

लेखन सराव




स्वतः
Self

मदत
Help

लेखन सराव

# अक्षर सौंदर्य

काना – ा ा ा ा ा ा ा ा ा ा ा

ऱ्हस्व वेलांटी– ि ि ि ि ि ि ि ि ि ि ि

दीर्घ वेलांटी – ी ी ी ी ी ी ी ी ी ी ी

ऱ्हस्व उकार – ु ु ु ु ु ु ु ु ु ु ु

दीर्घ उकार – ू ू ू ू ू ू ू ू ू ू ू

एक मात्रा – े े े े े े े े े े े े े े

दोन मात्रे – ै ै ै ै ै ै ै ै ै ै ै ै ै ै

एक काना, एक मात्रा – ो ो ो ो ो ो ो ो ो ो ो ो

एक काना, दोन मात्रे – ौ ौ ौ ौ ौ ौ ौ ौ ौ ौ ौ ौ

अनुस्वार – ां ां ां ां ां ां ां ां ां ां ां ां

विसर्ग : : : : : : : : : : :

# विरामचिन्हे

स्वल्पविराम – , , , , , , , , , , ,

अर्ध विराम – ; ; ; ; ; ; ; ; ; ; ;

पूर्ण विराम – . . . . . . . . . . .

उद्गारवाचक चिन्ह – ! ! ! ! ! ! ! ! ! ! !

प्रश्न चिन्ह – ? ? ? ? ? ? ? ? ? ? ?

अवतरण चिन्ह – “ ” “ ” “ ” “ ” “ ”

अर्ध चंद्र बिंदू – ँ ँ ँ ँ ँ ँ ँ ँ ँ ँ ँ ँ

स्वतः Self मदत Help

## खाली दिलेल्या सुचनांप्रमाणे अक्षरे वाच आणि गिरव.

लेखन सराव

अ

अ आ इ ई उ ऊ ए अॅ ऐ ओ ऑ औ अं अः

अ आ इ ई उ ऊ ए अॅ ऐ ओ ऑ औ अं अः

क

क का कि की कु कू के कॅ कै को कॉ कौ कं कः

क का कि की कु कू के कॅ कै को कॉ कौ कं कः

व

व वा वि वी वु वू वे वॅ वै वो वॉ वौ वं वः

व वा वि वी वु वू वे वॅ वै वो वॉ वौ वं वः

ब

ब बा बि बी बु बू बे बॅ बो बॉ बौ बं बः

ब बा बि बी बु बू बे बॅ बो बॉ बौ बं बः

प

प पा पि पी पु पू पे पॅ पै पो पॉ पौ पं पः

प पा पि पी पु पू पे पॅ पै पो पॉ पौ पं पः

ष

ष षा षि षी षु षू षे षॅ षै षो षॉ षौ षं षः

ष षा षि षी षु षू षे षॅ षै षो षॉ षौ षं षः

ण

ण णा णि णी णु णू णे णॅ णै णो णॉ णौ णं णः

ण णा णि णी णु णू णे णॅ णै णो णॉ णौ णं णः

फ

फ फा फि फी फु फू फे फै फो फौ फं फः


फ फा फि फी फु फू फे फै फो फौ फं फः

स्वतः Self मदत Help

**आठवडा 02**


# खाली दिलेल्या सुचनांप्रमाणे अक्षरे वाच आणि गिरव.

लेखन सराव




न ना नि नी नु नू ने नॅ नै नो नॉ नौ नं नः

न ना नि नी नु नू ने नॅ नै नो नॉ नौ नं नः




म मा मि मी मु मू मे मॅ मै मो मॉ मौ मं मः

म मा मि मी मु मू मे मॅ मै मो मॉ मौ मं मः




भ भा भि भी भु भू भे भॅ भै भो भॉ भौ भं भः

भ भा भि भी भु भू भे भॅ भै भो भॉ भौ भं भः



त ता ति ती तु तू ते तॅ तै तो तॉ तौ तं तः

त ता ति ती तु तू ते तॅ तै तो तॉ तौ तं तः



ट टा टि टी टु टू टे टॅ टै टो टॉ टौ टं टः

ट टा टि टी टु टू टे टॅ टै टो टॉ टौ टं टः



ठ ठा ठि ठी ठु ठू ठे ठॅ ठै ठो ठॉ ठौ ठं ठः

ठ ठा ठि ठी ठु ठू ठे ठॅ ठै ठो ठॉ ठौ ठं ठः



ढ ढा ढि ढी ढु ढू ढे ढॅ ढै ढो ढॉ ढौ ढं ढः

ढ ढा ढि ढी ढु ढू ढे ढॅ ढै ढो ढॉ ढौ ढं ढः



द दा दि दी दु दू दे दॅ दै दो दॉ दौ दं दः

द दा दि दी दु दू दे दॅ दै दो दॉ दौ दं दः

स्वतः Self

मदत Help

# खाली दिलेल्या सुचनांप्रमाणे अक्षरे वाच आणि गिरव.

लेखन सराव

ङ

ङ ङा ङि ङी ङु ङू ङे ङॅ ङै ङो ङॉ ङौ ङं ङः
ङ ङा ङि ङी ङु ङू ङे ङॅ ङै ङो ङॉ ङौ ङं ङः

त्र

त्र त्रा त्रि त्री त्रु त्रू त्रे त्रॅ त्रै त्रो त्रॉ त्रौ त्रं त्रः
त्र त्रा त्रि त्री त्रु त्रू त्रे त्रॅ त्रै त्रो त्रॉ त्रौ त्रं त्रः

ज्ञ

ज्ञ ज्ञा ज्ञि ज्ञी ज्ञु ज्ञू ज्ञे ज्ञॅ ज्ञै ज्ञो ज्ञॉ ज्ञौ ज्ञं ज्ञः
ज्ञ ज्ञा ज्ञि ज्ञी ज्ञु ज्ञू ज्ञे ज्ञॅ ज्ञै ज्ञो ज्ञॉ ज्ञौ ज्ञं ज्ञः

ह

ह हा हि ही हु हू हे हॅ है हो हॉ हौ हं हः
ह हा हि ही हु हू हे हॅ है हो हॉ हौ हं हः

घ

घ घा घि घी घु घू घे घॅ घो घॉ घौ घं घः
घ घा घि घी घु घू घे घॅ घो घॉ घौ घं घः

ध

ध धा धि धी धु धू धे धॅ धै धो धॉ धौ धं धः
ध धा धि धी धु धू धे धॅ धै धो धॉ धौ धं धः

छ

छ छा छि छी छु छू छे छॅ छै छो छॉ छौ छं छः
छ छा छि छी छु छू छे छॅ छै छो छॉ छौ छं छः

च

च चा चि ची चु चू चे चॅ चै चो चॉ चौ चं चः
च चा चि ची चु चू चे चॅ चै चो चॉ चौ चं चः

स्वत: Self मदत Help


लेखन सराव

## खाली दिलेल्या सुचनांप्रमाणे अक्षरे वाच आणि गिरव.



य या यि यी यु यू ये यॅ यै यो यॉ यौ यं यः

य या यि यी यु यू ये यॅ यै यो यॉ यौ यं यः



थ था थि थी थु थू थे थॅ थै थो थॉ थौ थं थः

थ था थि थी थु थू थे थॅ थै थो थॉ थौ थं थः




ज जा जि जी जु जू जे जै जो जौ जं जः

ज जा जि जी जु जू जे जै जो जौ जं जः




झ झा झि झी झु झू झे झॅ झै झो झॉ झौ झं झः

झ झा झि झी झु झू झे झॅ झै झो झॉ झौ झं झः



र रा रि री रु रू रे रॅ रै रो रॉ रौ रं रः

र रा रि री रु रू रे रॅ रै रो रॉ रौ रं रः




स सा सि सी सु सू से सॅ सै सो सॉ सौ सं सः

स सा सि सी सु सू से सॅ सै सो सॉ सौ सं सः



ख खा खि खी खु खू खे खॅ खै खो खॉ खौ खं खः

ख खा खि खी खु खू खे खॅ खै खो खॉ खौ खं खः



ग गा गि गी गु गे गॅ गै गो गॉ गौ गं गः

ग गा गि गी गु गे गॅ गै गो गॉ गौ गं गः

स्वतः Self मदत Help

## खाली दिलेल्या सुचनांप्रमाणे अक्षरे वाच आणि गिरव.

लेखन सराव

श

श शा शि शी शु शू शे शॅ शै शो शॉ शौ शं शः

श शा शि शी शु शू शे शॅ शै शो शॉ शौ शं शः

ल

ल ला लि ली लु लू ले लॅ लै लो लॉ लं लः

ल ला लि ली लु लू ले लॅ लै लो लॉ लं लः

ळ

ळ ळा ळि ळी ळु ळू ळे ळॅ ळै ळो ळॉ ळौ ळं ळः

ळ ळा ळि ळी ळु ळू ळे ळॅ ळै ळो ळॉ ळौ ळं ळः

क्ष

क्ष क्षा क्षि क्षु क्षू क्षे क्षॅ क्षै क्षो क्षॉ क्षौ क्षं क्षः

क्ष क्षा क्षि क्षु क्षू क्षे क्षॅ क्षै क्षो क्षॉ क्षौ क्षं क्षः

## खालील चित्रांचे निरीक्षण कर आणि माहिती सांग.











स्वतः Self मदत Help

**आठवडा 03** **चौकटीतील शब्दांचे वाचन कर आणि जसेच्या तसे लिही.** लेखन सराव

| | | | | |
|---|---|---|---|---|
| राज्य | मध्य | आम्ही | हत्ती | किल्ला |
| गप्पा | अन्न | पुन्हा | रक्त | शक्ती |
| शब्द | चष्मा | स्वच्छ | रस्ता | राष्ट्र |
| दृष्टी | संख्या | कुत्रा | जिल्हा | पत्ता |
| उत्तर | शिल्लक | तुम्हाला | म्हातारा | उन्हाळा |
| गुऱ्हाळ | स्वदेश | लक्ष्मण | पुष्कर | स्टेशन |
| विस्तव | महात्मा | डॉक्टर | अस्वल | उत्सव |
| स्वयंपाक | नमस्कार | सरस्वती | महत्वाचे | हिंदुस्तान |
| बहाद्दर | चंद्रभागा | महोत्सव | संध्याकाळ | चिमुकल्या |
| मुकाट्याने | खांद्यावर | घोड्यावर | गणराज्य | इतक्यात |

स्वत: Self मदत Help

लेखन सराव

# मुलाखत लेखन

तुमच्या गावातील/शहरातील सार्वजनिक सफाई कामगाराची मुलाखत घे आणि लिही.

उपक्रम : टिव्हीवर दाखवल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या मुलाखती पहा व त्यात कशाप्रकारे प्रश्न विचारले जातात ते समजून घ्या.

स्वतः Self मदत Help

# उतारा वाचन आणि लेखन

लेखन सराव

एवढासा काय तो उंदीर! साऱ्या घरात त्याने धुमाकूळ घातला. बाबांची पुस्तके काय कुरतडली, आईच्या साडीवर बारीक दातांनी नक्षी काढली, पायमोजाला एक–दोन खिडक्याही करुन टाकल्या. त्यामुळे गंपू वैतागून गेला. तो उंदीर पकडण्यासाठी त्याने नाही नाही ते प्रयत्न सुरु केले, पण उंदीरही फार चतुर. त्याला दाद देईना. उलट गंपूवरच डाव उलटायचा. कशी केली तुझी फजिती, असे जणू तो गंपूला हिणवायचा. एकदा उंदीर स्वयंपाक घरात जाताना गंपूला दिसला. त्याने झाडू घेऊन हळूच त्याचा पाठलाग केला, तर उंदीरमामा मोरीत बसलेले, खरकट्यावर ताव मारत. गंपूने उंदराच्या दिशेने झाडू फेकला, त्यामुळे माठ फुटला. खोलीभर पाणीच पाणी झाले. कसला आवाज झाला, म्हणून ताई लगबगीने बघायला आली.

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उतारा वाचून लिही.

१) घरात धुमाकूळ कोणी घातला?

..................................................

..................................................

२) गंपू कोणामुळे वैतागला होता?

..................................................

..................................................

३) उंदराने कशावर ताव मारला?

..................................................

..................................................

४) घरात उंदराने कोणकोणते नुकसान केले?

..................................................

..................................................

५) ताई काय बघायला आली?

..................................................

..................................................

## वाच आणि लक्षात ठेव.

| | |
|---|---|
| एका मिनिटात ६० सेकंद असतात. | एका महिन्यात २८ ते ३१ दिवस येतात. |
| एका तासात ६० मिनिटे असतात. | एका वर्षात १२ महिने येतात. |
| एका दिवसात २४ तास असतात. | एका सामान्य वर्षात ३६५ दिवस येतात. |
| एका आठवडयात ७ दिवस येतात. | एका लीप वर्षात ३६६ दिवस येतात. |


स्वतः Self मदत Help

# अनुलेखन

**तुझ्या भाषा विषयाच्या पाठ्यपुस्तकामधून तुझ्या आवडीचा पाठ घे आणि त्या पाठातील १० ओळी सुदंर अक्षरात लिहून काढ.**

**उपक्रम : पाठ्यपुस्तकातील कोणतेही १० जोडशब्द तुझ्या वहीत लिही.**





स्वतः
Self



मदत
Help

आठवडा 04

## खालील वाक्य वाच आणि पुन्हा लिही.

लेखन सराव

रवीला धक्का लागला.

उग्र वास कशाचा आहे?

बुवांनी बुक्का लावला.

आमचे भाग्य चांगले आहे.

माकडांची नक्कल करु या.

योग्य तो विचार करा.

अक्कल विकत घेतली.

हे दख्खनचे पठार आहे.

भक्तगण देवळात बसले.

मन एकाग्र करा.

दोन सख्खे भाऊ होते.

मनसोक्त मजा कर.

शंतनू कृतघ्न आहे.

एका वाक्यात उत्तर सांग.

निर्विघ्न कार्य पार पडावे.

श्रीकृष्ण हा चक्रधारी आहे.

कच्चा माल वापरला.

दत्त दिगंबर दैवत माझे.

गावाच्या आसपास झाडी आहे.

शक्यता फार कमी आहे.

फुलांचा गुच्छ माझ्याकडे दे.

आपली योग्यता पडताळा.

हिंदवी स्वराज्य उदयास आले.

डॉक्टर कोणते आहेत?


स्वतः Self मदत Help

# कथा वाचन

लेखन सराव

एकदा दोन मित्र राहुल आणि सुरज फिरायला निघाले. फिरता फिरता एका छोट्या गावात पोहचले. त्या गावामध्ये काही उनाड मुलं होती. ती मुलं त्यांना त्रास देऊ लागली. त्यामुळे राहुल आणि सुरज वेगाने पळत नदीकाठी गेले. पळता पळता राहुल सुरजच्या अंगावर पडला. सूरजने राहुलच्या गालामध्ये मारले. राहुल खुप दुःखी झाला. त्याने वाळूवर लिहिले ''आज माझा मित्र सुरज याने मला मारले.'' त्यांना नदी पार करायची होती. नदी थोडी खोल होती. तिथे चिखल सुद्धा होता. नदीच्या पलीकडे जाता जाता राहुलचा पाय घसरला आणि तो पाण्यामध्ये बुडू लागला. सुरज लगेच पुढे झाला व त्याने राहुलचा हात पकडला. हळूहळू त्याला नदीच्या पलीकडे घेऊन गेला. नदीच्या पलीकडे गेल्यावर राहुलने सुरजचे आभार मानले. त्याला मिठी मारली व तिथे एका खडकावर लिहिले, ''आज माझा मित्र सुरज, याने माझा जीव वाचवला'' हे पाहिल्यावर सूरजने राहुलला विचारले की, 'तू असं का बरं केलंस? पहिल्यांदा मी जेव्हा तुला मारलं, तेव्हा तू वाळूमध्ये लिहिलं आणि आता जेव्हा मी तुझा जीव वाचवला तेव्हा ती गोष्ट तू खडकावर लिहिलीस. राहुल म्हणाला , 'मी वाळूवर लिहिले कारण ते वाऱ्याची एक झुळूक जरी आली तरी ते मिटून जाईल, परंतु खडकावर लिहिलेले चिरकाल टिकून राहील.

खालील चित्र सुंदर रंगात रंगव.



उपक्रम : हुशारी, धाडसीपणा, लोभी, प्रामाणिकपणा अशा प्रकारे वेगवेगळ्या बोध देणाऱ्याा गोष्टी शोधुन त्यांचे वाचन कर व त्या इतरांना सांग.

स्वतः Self मदत Help

लेखन सराव

# प्रकट वाचन

खाली दिलेल्या उताऱ्याचे प्रकट वाचन कर.

चार ओळी लिहिल्यास, त्यात किती चुका! अक्षरसुद्धा किती गचाळ!

''मला सारे असेच म्हणतात. अक्षर सुधारण्यासाठी काय करावे हे मात्र कोणी सांगत नाही.''

सांगते ना. रोज फक्त पाच ओळी लिहित जा.

''एवढेच ना?'' अरे, त्या नुसत्याच उतरवायच्या नाहीत. त्यासाठी मन एकाग्र करुन सावकाश लिही.

प्रत्येक अक्षर वळणदार आलं पाहिजे. लिहिताना अशुद्ध लिहीत नाही ना, यावर लक्ष ठेव.

''मी रोज व्यायाम करतो, उजळणी म्हणतो, पाठांतर करतो, तसेच हे देखील नियमाने करीन. मग, सुधारेल ना माझं अक्षर?''

नक्की सुधारेल.

## खालील कोडी सोडव.

काळा काळा रंग,
वस्तू कुरतडण्यास दंग
मनीमाऊ येताच पळून जातो
आणि बिळात जाऊन
दडून बसतो

ओळखा पाहू मी कोण?
हिरवा, पिवळा रंग.......
आहे आंबट गोड चव माझी .....
आहे क जीवनसत्व भरपूर .......
गाव माझं नागपूर .......

## खालील शब्दातील लपलेले शब्द सांग व लिही.

जनावरे – नाव

पाऊस –

गारवा –

आमदार –

गारवारा–

रक्षाबंधन


स्वतः Self मदत Help

लेखन सराव

# अनुभव कथन

''**अचानक आलेला पाऊस**'' या विषयावर तुझे अनुभव सांग आणि लिही.

उपक्रम : तुझी आतापर्यंत कधी फजिती झाली आहे का? त्या प्रसंगाचा अनुभव तुझ्या मित्र/मैत्रिणींना सांग.


स्वतः
Self


मदत
Help

**आठवडा 05**

# श्रवण आणि संभाषण


लेखन सराव

पाऊस, वारा, रेल्वे, बस, फेरीवाला या सर्वांचे आवाज ऐक. या आवाजांविषयी तुला काय वाटते? हे आवाज कुठे आणि कधी ऐकायला मिळतात. अशा प्रकारे सहयोगी गटात चर्चा कर.

शेजारील सारणीमूधन खालील शब्दांचे समानार्थी शब्द शोध आणि लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वृ | सा | पा | ल | रा |
| क्ष | ग | ज | ख | न |
| दू | र | ग | ध | सु |
| दि | स | री | ता | प |
| ह | न | ब | छा | या |


| | |
|---|---|
| पक्षी = | सावली = |
| जंगल = | दिवस = |
| लांब = | समुद्र = |
| नदी = | दीन = |
| पाणी = | झाड = |


स्वतः Self

मदत Help

# प्रसंग वर्णन

लेखन सराव



वर दिलेल्या चित्राचे निरीक्षण कर आणि त्यावर आधारित दिलेले प्रश्न तुझ्या सहयोगी गटातील विद्यार्थ्यांना विचार.

१. हे चित्र कशाचे आहे ?

..............................................................................................

..............................................................................................

२. या चित्रात मुले काय करत आहे ?

..............................................................................................

..............................................................................................

३. या चित्रातुन आपल्याला कोणता संदेश मिळतो ?

..............................................................................................

..............................................................................................

४. चित्र पाहुन चित्राविषयी एक घोषवाक्य सांग.

..............................................................................................

..............................................................................................

# कोण काय करतो ?

सोनार : दागिने तयार करतो.

चांभार : ____________________

लोहार : ____________________

सुतार : ____________________

गवंडी : ____________________

न्हावी : ____________________

माळी : ____________________

कुंभार : ____________________

शिंपी : ____________________

आचारी : ____________________

स्वत: Self मदत Help

लेखन सराव

# कविता वाचन आणि लेखन

आकाश जर आरसा असते, किती छान झाले असते!
सर्व जगाचे प्रतिबिंब स्पष्ट त्यात पडले असते!
सुंदर निर्मळ देखावे, बसल्या जागी पाहिले असते!
कोठे काय चालले आहे, चटदिशी कळले असते!
रात्र कधी पडलीच नसली, अष्टोप्रहर दिसले असते,
सुरेख अशा आरसे महालात जग मजेत जगले असते!

पुढील प्रश्न काळजीपूर्वक वाच व अचूक उत्तर लिही.

१) आकाश रुपी आरशात कोणाचे प्रतिबिंब पडले असते?

.............................................................................................................

.............................................................................................................

२) कविला बसल्याजागी काय पहायला मिळाले असते?

.............................................................................................................

.............................................................................................................

३) अष्टोप्रहर या शब्दाचा अर्थ सांग.

.............................................................................................................

.............................................................................................................

४) कविने आकाशाला काय म्हटले आहे?

.............................................................................................................

.............................................................................................................

५) आरसे महाल कसा आहे?

.............................................................................................................

.............................................................................................................

उपक्रम : दिलेल्या शब्दावरुन वाक्य तयार कर.

डॉक्टर, भाग्य, विश्व, कष्टाळू, भविष्य, चमत्कार, नाष्टा

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

स्वत: Self मदत Help

# विरामचिन्हे

लेखन सराव

अरे वा चिमुकल्यांनो मला तुम्हाला कधीचं बघायचंच होत तुम्ही खरच आहात की नाही मला स्वप्न पडलंय नाही तू जागाच आहेस ऐक जरा बंडू आम्हाला सशाने सांगितलंय की तू प्रेमळ दयाळू आहेस म्हणून तू मदत करशील आम्हाला आम्ही आपली घरे सोडून इथे आलोय या नदी पलीकडच्या इच्छापूर्ती रानात जायचंय आम्हाला पण उडायला पंख नाहीत की आमच्याजवळ होड्या नाहीत नदी पार कशी करता येईल तू सांगतोस काही उपाय चंदूने विचारले

विरामचिन्हांचा वापर करुन उतारा पुन्हा लिही.

शाळेत बनविलेल्या पणत्या आणि उटणे विकण्यासाठी जाहिरात तयार कर.

स्वतः Self मदत Help

**आठवडा 06**

# बोलीभाषा परिचय

लेखन सराव

## वऱ्हाडी बोलीभाषा

खाली दिलेला उतारा वाच.

नानूआजा म्हणायचा, 'तुमी काई वाटून घेऊ नका. तुमचा तरी काय इलाज? जमानाच बदलला त्याले तुमी तरी कसं थोपवून धरचान? तसं आता माहं राह्यलयं काय म्हणा... जगलो आस्तो आजून दहा – बारा सालं. पण मरतो आता उपासमारीनं... पण तुमाले सांगतो हे हाब्रीड तुमचंबी, हाब्रीड करंल एक दिवस. आरे पीक व्हते म्हन्ता बदबद. पण त्यो नुस्ता भपका. दिसायले देखावा. सम्दं उत्पन्न खर्चातच आटून जाते न तुमचं. दांडातलं पाणी दांडातच आटून जाते. वाफा कोल्डा फटांग. हे बर्कताचं आस्तं त पैसा जाते कुठी तुमचा? हायल्या कावून नाई बांधून राह्यले शेतकरी ते त सोडाच. पण हे निकस खाऊ खाऊ तुमीबी निकस होऊन जासाल हाळू हाळू. जाणूनबुजून रसायन हे. आन् रसायन का तग धरते का लय दिवस? भुई गळण धावून मरंल एक दिवस पोटी पिकायची ताकदच उरणार नाई तिच्यात अन् मंग तुमचं कर्ज कशाच्या माथं फेडसाल तुमी? हाय हाय करचान नुस्ते शाप लागलं तुमाले या भुईचा. आरे ती दिसायले निरजीव आसली तरी जीव आस्ते तिले. तवाच त पोटी पिकती ती. पण तिच्यावर आसा अत्येचार केल्यावर किती दिवस दम धरणार हाय ती?

**अहिराणी बोली**

गावात तात्या वाचून पान हालनं नही. मानोस काही सिकेल व्हता असे नाहीपण कोनी. कायटाप त्याले आंग्ठेबहादूर म्हनानी? चांग्ला जुनी फायनल व्हयेल व्हई आसे वाटानं तिन्ही भाऊ, तात्या ह्या चार भाऊ. वावरात काम करानां.

बोलीभाषेतील शब्दांचे अर्थ प्रमाणभाषेत सांग आणि लिही.

| | |
|---|---|
| १. सिकेल – | १. घारा – |
| २. व्हता – | २. दोपारसों – |
| ३. टाप – | ३. लीविलेली – |
| ४. फायनल – | ४. वाशीली – |

उपक्रम : तु बोलत असलेल्या किंवा तुझ्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेविषयी माहिती मिळव आणि लिही.


स्वतः Self

मदत Help

लेखन सराव

# संवाद वाचन आणि लेखन

''काय? तुझा पेपर पण लवकर लिहून झाला ना?''

'' हो, ना! किती सोपा होता गं!''

'' पृथ्वीचा आकार तू कसा लिहिला आहेस?''

'' कसा म्हणजे काय? आपल्या बाईंनी सांगितलं नव्हतं का, की पृथ्वी नारिंगासारखी आहे म्हणून! तूही तसंच लिहिलंस ना?''

छे बाई, मी नाही तसं लिहिलं.''

''अगं, मग तू लिहिलंस तरी काय उत्तर?''

मला नाही संत्र आवडत. मला आंबाच फार आवडतो.

म्हणून मी लिहिलं की पृथ्वीचा आकार आंब्यासारखाच आहे.''

वरील संवाद वाच आणि त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही.

प्र.१. वरील संवाद केव्हा झाला असावा?

..........................................................................................

..........................................................................................

प्र.२. बाईंनी शिकवल्याप्रमाणे उत्तर लिहिणाऱ्या मुलीने पृथ्वीचा आकार कशाप्रमाणे लिहिला?

..........................................................................................


..........................................................................................


प्र.३. कोणत्या विषयाचा पेपर होता?

..........................................................................................

..........................................................................................

रिकाम्या जागी एक शब्द लिहून त्याला उपसर्ग/प्रत्यय जोडून तयार होणारे अर्थपूर्ण शब्द लिही.



# उभयान्वयी अव्यये आणि केवलप्रयोगी अव्यये

खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये ओळख आणि ती कोणत्या शब्दांना जोडतात ते लिही.

१. त्याचे घर आणि शाळा समोरासमोर आहे.

२. मी जेवतो व खेळायला जातो.

३. ललित झाडावर चढून आंबे काढ किंवा खाली पडलेले वेचून टोपलीत ठेव.

४. आपण देशासाठी वेळ देणार आहोत की नाही?

५. घराबाहेर जाताना सर्व दिवे आणि नळ आठवणीने बंद करावेत.

६. बाबा नेहमीच बचत करतात; पण स्वतःसाठी खर्च करत नाहीत.

खालील वाक्यात योग्य केवलप्रयोगी अव्यये लिहून वाक्य पूर्ण कर.

१. ........................ किती टवटवीत आहेत ही फुले !


२. ........................ पडलास का रे?

३. ........................ किती मळवलीस रे कपडे!

४. ........................ पहिला क्रमांक आला ना? अभिनंदन!

५. ........................ तो बघ वाघ!


तुला माहित असलेल्या सर्व उभयान्वयी अव्यये यांची एक मोठी माळ तयार कर आणि वर्गातील भिंतीवर लाव.



स्वतः Self मदत Help

# सूचना फलकाचे वाचन आणि लेखन

लेखन सराव




१. वरील चित्र कोणत्या ठिकाणाचे आहे ?

२. चित्रात काय काय दिसत आहे ?

३. सूचना फलकावर कोण कोणत्या सूचना दिल्या आहेत ?

४. किल्ला चढताना सुरुवातीलाच सूचना का दिल्या आहेत ?

५. किल्ला पहायला येणाऱ्यांना सूचना देण्याची गरज आहे का? व का?

सूचना फलक कोठे कोठे असतात याचा शोध घे आणि त्याची यादी कर.

स्वतः Self    मदत Help

आठवडा 07

# वारली हस्तकला

लेखन सराव

**खालील चित्राचे निरीक्षण कर आणि चित्राविषयी माहिती सांग.**



**तुला माहित असलेल्या ५ प्रकारांच्या नृत्यांची माहिती सांग आणि लिही.**

स्वतः Self मदत Help

# निमंत्रण पत्रिका

लेखन सराव




१) निमंत्रण पत्रिका कशाची आहे?

..............................................................................

..............................................................................

२) कार्यक्रम कोणी आयोजित केला आहे?

..............................................................................

..............................................................................

३) कार्यक्रमाची वेळ आणि ठिकाण कोणते?

..............................................................................

..............................................................................

४) कार्यक्रम कधी आहे?

..............................................................................

..............................................................................

५) कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कोण आहेत?

..............................................................................

..............................................................................

स्वतः Self ○ मदत Help ○

# माझे दैनंदिन वेळापत्रक

दोन वेळापत्रके बनव. पहिल्या वेळापत्रकात शाळेच्या दिवशी सध्या तु जे काही करतो/करते ते नोंदव. तु प्रत्येक कामासाठी किती वेळ घालवतो/घालवते हे सुद्धा लिही. तुझ्या वेळापत्रकावर तुझ्या मित्र/मैत्रिणींशी चर्चा कर आणि मग तुझे नवीन वेळापत्रक तयार कर.

| माझे सध्याचे वेळापत्रक | |
|---|---|
| वेळ | मी काय करतो/करते? |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

| माझे नवीन वेळापत्रक | |
|---|---|
| वेळ | मी काय करावे? |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |



○ स्वतः Self ○ मदत Help

लेखन सराव

# श्रुतलेखन

कोणताही एक उतारा तुझ्या मित्र/मैत्रिणीला सांगायला लाव आणि त्या पाठोपाठ शुद्धलेखन लिही.

उपक्रम : 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' ही कविता ऐक.

स्वत: Self मदत Help

आठवडा 08

# श्रवण आणि संभाषण

लेखन सराव

आवडणारा पक्षी, प्राणी किंवा इतर कोणताही आवडणारा विषय घेऊन गाणे तयार कर आणि आपल्या वर्गात सादर कर.

पुढील वाक्यांचे काळ बदलून लिही.

१) जॉन जेवण जेवत आहे. (पूर्ण भूतकाळ)

..........................................................................................

..........................................................................................

२) खूप पाऊस पडेल. (साधा वर्तमानकाळ)

..........................................................................................

..........................................................................................

३) एडिसनने निरनिराळे प्रयोग केले. (साधा भूतकाळ)

..........................................................................................

..........................................................................................

४) सुलभा पुस्तक वाचेल. (पूर्ण भविष्यकाळ)

..........................................................................................

..........................................................................................

स्वतः Self मदत Help

# जाहिरात लेखन

लेखन सराव

"आरोग्यम धनसंपदा"

## हनुमान व्यायामशाळा

मा. सुरेश माने यांची व्यायामशाळा

उत्तम आरोग्य हेच खरे धन

वेळ: सकाळी 6 ते रात्री 9

**आमची वैशिष्ट्ये:**

वातानुकूलित प्रशस्त जागा

आधुनिक सामग्री

तज्ज्ञ प्रशिक्षक

**संपर्क:**

हनुमान व्यायाम शाळा, एम. जी. रोड, नाशिक.

१) ही जाहिरात कशाची आहे?

..............................................................

..............................................................

२) आरोग्य विषयक एक घोषवाक्य तयार कर.

..............................................................

..............................................................

३) ही व्यायामशाळा कोणाची आहे?

..............................................................

..............................................................

४) या व्यायामशाळेची वैशिष्ट्ये काय आहेत?

..............................................................


..............................................................


५) व्यायामशाळेची वेळ कोणती आहे?


..............................................................

..............................................................

खालील आकृत्यांमधून शब्द जोडून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार कर.





स्वतः Self


मदत Help

# सरळ रुप आणि सामान्य रुप

खालील वाक्ये वाचून त्यातील सरळरुप, सामान्यरुप, प्रत्यय ओळख आणि तक्त्यात लिही.

| अन. | वाक्ये | सरळरुप | सामान्यरुप | प्रत्यय |
|---|---|---|---|---|
| १. | माधव गावाला गेला. | | | |
| २. | तो व्हरांड्यात बसतो. | | | |
| ३. | पेन्सिल वहीत ठेव. | | | |
| ४. | खिडकीत कुंडी आहे. | | | |
| ५. | पक्ष्यांनी दाणे टिपले. | | | |

खालील वाक्य पूर्ण होण्यासाठी कंसात दिलेल्या शब्दाचे योग्य सामान्यरुप लिही.

१. त्याच्या(डोके) ................वर टोपी आहे.

२. मधुरिमाने(पक्षी)...................साठी भांड्यात पाणी ठेवले.

३.(झाडे)................. ची पाने वाऱ्याने हलत होती.

४. आज(वासरु)................... ने चारा खाल्लाच नाही.

५. त्याने चहा(बशी)................... त ओतला.

खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा आणि ती कोणत्या शब्दांशी जोडली गेली आहेत ते लिही.


१. त्याचे घर शाळेसमोर आहे.

२. मी जेवणानंतर खेळायला जातो.

३. ललितने झाडावर चढून आंबे तोडले.

४. आपण देशासाठी वेळ देणार आहोत की नाही?

५. घराबाहेर जाताना सर्व दिवे आणि नळ आठवणीने बंद करावेत.


स्वतः
Self

मदत
Help

# कल्पनात्मक निबंध लेखन

लेखन सराव

**'माणूस अमर झाला तर......'** या विषयावर निबंध लिही.

उपक्रम : **'लॉकडाऊन नंतर शाळेचा पहिला दिवस'** या विषयावर निबंध तुझ्या वहीत लिही.

स्वत: Self मदत Help

आठवडा 09

# अनुभव लेखन

**'कोरोनामुळे शाळेला अचानक लागलेली सुट्टी'** या विषयावर तुझे अनुभव लिही.

उपक्रम : ''किलबिल किलबिल पक्षी बोलती'' ही कविता ऐक.

स्वतः Self मदत Help

## बातमी वाचन

वृत्तपत्रामध्ये आलेल्या घटनेचे वाचन कर आणि आपल्या सहयोगी गटामध्ये चर्चा कर.

# काव्यमय वाटेवर 'मराठी पाऊल' पडले पुढे..!

## 'पासबान-ए-अदब'चा पुढाकार : हिंदी, उर्दू साहित्यिकांचे मराठीतून काव्यसंमेलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** 'मराठी भाषा गौरव दिना'च्या पार्श्वभूमीवर पासबान-ए-अदब संस्थेच्या माध्यमातून हिंदी व उर्दू साहित्यिकांचे प्रथमच मराठीतून काव्यसंमेलन पार पडले. या कार्यक्रमात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या देशी व विदेशी कवी आणि शायरांनी हिंदी व उर्दू भाषेतील त्यांच्या रचना मराठीत सादर केल्या.

राज्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक कैसर खालिद यांनी अभिजात भारतीय भाषांचे जतन आणि संवर्धनासाठी पासबान - ए-अदब या संस्थेची स्थापना केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून रविवारी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात हा विशेष कार्यक्रम पार पडला. त्यात दिग्गज कवींनी सादर केलेल्या रचनांना सभागृहातील दर्दी प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले.

या कार्यक्रमात अशोक नायगावकर, संदीप खरे, वैभव जोशी, कवी किशोर कदम, खलील मोमीन, शिल्पा देशपांडे, शर्वरी जोशी यांचा समावेश होता. सहभागी सर्व कवींचे अस्सल मराठमोळी वेशातील महिलांनी औक्षण केले.

शर्वरी जोशी यांनी थेट 'दिला'ला साद घालून, कार्यक्रमाला उंची देण्याची पायाभरणी केली. खलील मोमीन यांच्या 'कच्च्या वहीतील' कवितांनी त्यांच्या पक्क्या भावुकतेची प्रेक्षकांना जाणीव झाली. शिल्पा देशपांडे यांनी देवदासींच्या वेदनांच्या दाहकतेला वाट मोकळी करून देताना, थेट परमेश्वरालाच नरकात पाठविण्याचा घेतलेला क्रांतिकारी निर्णय उपस्थितांना स्तिमित करून गेला. वैभव जोशींच्या एकापेक्षा एक तरल आणि भावविभोर कवितांनी सभागृहाचे वातावरणच पालटून टाकले, तर संदीप खरेंच्या प्रेम कवितेला आणि त्याबाबतच्या निरुपणात्मक शेरेबाजीमुळे प्रेक्षकांचे मनसोक्त मनोरंजन झाले.



पोलीस दलात उच्चपदस्थ असूनही भाषांच्या संरक्षण व संवर्धनासाठी मी करीत असलेले प्रयत्न काहींना 'वेडेपणा' वाटतो. मात्र, वेडेपणातूनच अनेकदा अद्‌भुत अस्सल लौकिक जन्माला येते, हा विविध क्षेत्रांतील पूर्वइतिहास मला ज्ञात असल्याने, माझे प्रयत्न अविरतपणे सुरूच राहतील.

**- कैसर खालिद, संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष**

किशोर कदम यांनी खास त्यांच्या मुलासाठी लिहिलेली पुस्तकांचे जीवनातील महत्त्व व स्थान सिद्ध करणारी कविता प्रत्येकालाच आपली वाटली. 'मिश्किली'साठी ख्यातनाम असलेले अशोक नायगावकर यांनी दर्दी व प्रगल्भ प्रेक्षकांना पाहून मिश्किलतेला फाटा दिला आणि रंजल्या - गांजलेल्याच्या संघर्षशील जीवनशैलीवर प्रकाश टाकणारी कविता सादर केली. या कार्यक्रमाचे शिल्पा देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले .

खालील वाक्यांचे प्रकार ओळख आणि लिही.

१. जेव्हा वेळ मिळेल, तेव्हा मी बागेत जाईल.

२. आकाशात ढग जमले की, मोर नाचू लागतात.

३. नियमित अभ्यास केला तर, परीक्षेच्यावेळी गडबड होत नाही.

४. रईसा रोज सकाळी घरकामात मदत करते आणि सायंकाळी अभ्यास करते.

५. तिने घडलेल्या सर्व घटना सांगितल्या; परंतु तरीही त्यांचे समाधान झाले नाही.

६. पाऊस आला की शेतकरी पेरणीला लागतो.

७. मंदा खो खो खेळेल किंवा समुहगीतामध्ये भाग घेईल.

८. माझे बोलून झाले की मग तू बोल.

९. जेवढी भूक लागते तेवढेच खाणे म्हणजे प्रकृती.

१०. आपल्या जेवणातील दोन घास भुकेलेल्यांना खाऊ घालावेत.


स्वतः Self मदत Help


# प्रकट वाचन

खाली दिलेल्या उताऱ्याचे प्रकट वाचन कर.

आपण सर्वजण स्वप्ने पाहत असतो. आपल्याला वाटत असते की; मला कोणीतरी बनायचे आहे. माझ्या आवडीचे असे काहीतरी साध्य करावयाचे आहे. मला खूप मोठे व्हायचे आहे. असा विचार जेव्हा आपण करतो; तेव्हा खरे तर आपण स्वप्नंच पहात असतो. खूप मोठे होणे, आवडीचे असे काहीतरी बनणे, साध्य करणे हे प्रत्यक्षात आणण्यासाठी आपणास काही गोष्टी निश्चित कराव्या लागतात. त्या म्हणजे आपले ध्येय ठरविणे. ते गाठण्यासाठीचे शिस्तबद्ध नियोजन करणे. आणि त्याबर हुकुम नियमित व सातत्याने प्रयत्न करणे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे अब्दुल कलाम म्हणतात, ''झोपेत नाही तर जागेपणी पाहिलेली स्वप्नेच खरी होतात''पण यासाठी हवी असते ती जिद्द, चिकाटी, चिवट प्रयत्न, आणि यशाच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठीचा दुर्दम्य आशावाद!

तुम्हाला कोण व्हावेसे वाटते? हे पुढील मुद्यांच्या आधारे लिही.



# मुलाखत वाचन व लेखन



तुमच्या नात्यातील अगदी जवळच्या व्यक्तीने त्याचे स्वप्न पूर्ण केलेले आहे. त्याची मुलाखत घेण्यासाठी पाच प्रश्न तयार कर.

कोरोना परिस्थितीमुळे उद्भवलेल्या, तुला जाणवलेल्या कोणत्याही पाच समस्या सांग.


स्वत: Self मदत Help

**आठवडा 10**

# संवाद लेखन

**समजा, कोरोना विषाणू तुझ्या स्वप्नात आला आहे, तर त्याच्याशी केलेला संवाद येथे लिही.**

**खाली दिलेल्या इमोजींचा(भावमुद्रा) वापर तु कोणत्या भावना व्यक्त करण्यासाठी करतो/किंवा करु शकाल? याविषयी आपल्या सहयोगी गटात चर्चा कर.**



स्वतः Self मदत Help

## जाहिरात लेखन

खाली दिलेल्या जाहिरातीचे वाचन कर आणि त्यावर आधारीत प्रश्न तयार कर व त्याची उत्तरे लिही.




स्वत: Self मदत Help

लेखन सराव

# कथा वाचन आणि लेखन

खालील अपुर्ण कथा पुर्ण कर.

दिवस कधी मावळला ते कळलेच नाही त्या दिवशी! पाहुण्यांनी घर भरुन गेलं होतं आजीच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत होती. सर्वजण या निमित्ताने एकत्र आलेले पाहून आजी तृप्त झाली होती. एकमेकांशी रक्ताने व मनाने जोडलेल्या तीन पिढ्या एकत्र जमल्या होत्या. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर संध्याकाळी हास्यविनोदात, मनमोकळ्या गप्पांत! सारेजण दंग होते आणि अगदी अचानक या गप्पांत एक अनोळखी आवाज ऐकू आला 'जिजी... मी आलो ग!'

खूप वर्षांनी आजीने हा आवाज ऐकला आणि..........................................................

उपक्रम : वर्तमान पत्रातील खेळा संदर्भातील बातम्यांची कात्रणे जमा कर आणि आपल्या सहयोगी गटात वाचून दाखव.

स्वतः Self मदत Help

# घटनाक्रम

खाली दिलेल्या वाक्यांचा योग्य क्रम लाव.

घरी आल्यावर आंबे धुतले.

आजी बाजारात गेली.

आंब्याचा रस केला.

तिने आंबे आणले.

बाजारात भरपूर फळे होती.

पिठाची छान भाकरी भाजली.

रमाने गहू आणले.

गहू गिरणीतून दळून आणले.

तिने ते स्वच्छ निवडले.

सर्वांनी भाकरी आवडीने खाल्ली.

# विशेषण

खालील वाक्यातील विशेषण शोध. त्यासाठी अगोदर नाम शोध. मग त्याचे वर्णन करणारी विशेषण सहज सापडतील, ते खालील चौकटीत लिही.

१) ‘ही मुलगी हुशार आहे बरं का!‘

२) नदीकाठी मऊ माती होती, काळेभोर खडक होते आणि दाट झाडी होती,
पाणी खोल नव्हते; पण स्वच्छ होते.

| विशेषण | नाम |
|---|---|
| | |
| | |
| | |

पुढे दिलेल्या विशेषणाचे योग्य रूप वापरुन वाक्य पुर्ण कर.

१) इवलासा ‘ अग्गोबाई! ---- बाहुली आणि तिचा– ---- पाळणा! आणि दागिनेसुद्धा! किती गोड

उपक्रम : पाऊस कसा पडतो या घटनेचा क्रम तुझ्या वहीत लिही.

सुरवातीच्या अक्षरापासून बनवलेल्या नामांचे पत्ते तयार कर आणि मुलांनी सहयोगी गटात बसून एक एक पत्ता उचलावा व आठवून वर्णन करणारे शब्द सांगून यादी कर.

**आठवडा 11**

# काळ

**खालील परिच्छेदातील क्रियापदाचा योग्य काळात बदल करुन अर्थपूर्ण परिच्छेद तयार कर.**

उद्या खग्रास ग्रहण(असणे). दक्षिण आशिया खंडात बहुतेक सर्व ठिकाणी ते (दिसणे) ---------- मात्र भारतात सध्या वातावरण ढगाळ(असणे)--------आणि पुढील चार दिवस ते तसेच (राहणे)---------, असा वेधशाळेचा अंदाज (असणे) --------काही महिन्यांपूर्वी ही ग्रहण पाहण्याची संधी याच कारणांमुळे (हुकणे) --------- आता खगोलप्रेमींना पुढच्या ग्रहणासाठी आणखी काही दिवस थांबावे (लागणे)------------

**खालील विषयांवर घोषवाक्य तयार कर.**

रक्तदान, शिक्षणाचे महत्व, लसीकरण, पाणी

स्वतः Self मदत Help

# माझा शब्दसंग्रह

**शब्दकोशाचा वापर करुन खालील शब्दांचे अर्थ शोध.**

| | | | |
|---|---|---|---|
| फळकुट | ________ | हालहवाल | ________ |
| कांबट्या | ________ | बळीराजा | ________ |
| वाकळ | ________ | जित्राबं | ________ |
| फैनाबाज | ________ | हेळसांड | ________ |
| ओढाळ | ________ | वेसण | ________ |

**खालील उताऱ्याचे मूकवाचन कर.**

काल सकाळी सहाच्या सुमारास मी बाबांबरोबर फिरायला गेलो होतो. पूर्वेकडून सूर्य वर येत होता. सूर्याची ती लालसर पिवळी किरणे किती वेगळी व छान दिसत होती! त्यांच्याकडे मी वारंवार पाहत होतो. सकाळचा तो गारवा किती छान वाटत होता. रस्त्यातल्या झाडांवर वेगवेगळे पक्षी बसलेले होते. त्यांचे वेगवेगळे आवाज कानांवर पडत होते. बाबा खूपच भरभर चालत होते. चालता चालता मी मात्र दमलो होतो. बाबांना मी थांबायला सांगितले. आम्ही एका ठिकाणी बसलो. बाबा सकाळच्या मोकळ्या व शुद्ध हवेविषयी मला सांगत होते. खरंच त्या शुद्ध व मोकळ्या हवेचा अनुभव मला येत होता. मला प्रसन्न व ताजेतवाने झाल्यासारखे वाटत होते. रोज सकाळी लवकर उठण्याचा आणि फिरायला जाण्याचा अनुभव तुम्हीपण घ्या. तुम्हांलाही छान वाटेल.

**एका मिनिटामध्ये तु किती शब्द वाचले?**


**वाचलेली शब्द संख्या =...............**

**पुढील प्रत्येक सुरवातीच्या अक्षरांपासून नाम, विशेषण, क्रियापद तयार कर आणि खालील दिलेल्या उदाहरणातील वाक्याप्रमाणे प्रत्येक सुरवातीच्या अक्षरांपासून वाक्य तयार कर.**

**त, म, ग, च, ट, ब, स, श**

| उदा. | नाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| क | कप | काळा | करतो |
| प | पर्वत | पांढरा | पडेल |

उदा. – कपाचा रंग काळा आहे.


स्वतः Self

मदत Help

# पत्र वाचन आणि लेखन

खालील पत्राचे वाचन कर व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.

दि.१५/०६/२०२१

प्रिय बाई,

टिव्हीवर परत यावर्षी कोरोना १९ मुळे शाळा ऑनलाईन सुरू होणार आहे, ही बातमी पाहिली आणि गेल्या वर्षीचा जून महिना डोळ्यासमोर तरळू लागला. बाई गेल्या जून मध्ये कोरोनामुळे शाळा सुरू होणार नाही हे ऐकून खरं तर खूप आनंद झाला. खरं खरं सांगते बाई हा आनंद क्षणभंगुर होता. थोड्याच दिवसात या सुट्ट्या आपल्यापासून काही हिरावून घेत आहेत याची जाणीव होऊ लागली. कुठेतरी नवीन शिकण्यापासून शाळेतील गमतीजमती, नवीन मित्र – मैत्रिणी आणि भन्नाट खेळांपासून आम्ही पोरके होत आहोत का? असे वाटायला लागलेय.

शाळेतला प्रत्येक तास, तुमचे शिकवणे हे आठवू लागलेय. बाई एक विनंती आहे! तुमच्या मोठ्या साहेबांना सांगा आणि माझी शाळा पुन्हा सुरू करा.

तुमची,

सायली

माझा पत्ता :

सायली कदम

मु.पो. आंबेजोगाई

ता. आंबेजोगाई,

जि. बीड,

पिन –४३१५१७.

अ) पत्र लिहिणाऱ्या मुलीचे नाव तू कशावरुन ओळखलेस ते लिही.

..........................................................................................

..........................................................................................

ब) 'काही काळापुरतेच' यासाठी पत्रात कोणता शब्द आला आहे ते लिही.

..........................................................................................

..........................................................................................

क) पत्रात सायलीने कोणत्या वर्षातील जून महिन्याचा उल्लेख केला आहे?

..........................................................................................

..........................................................................................

ड) पत्रातील सायलीच्या पत्त्याप्रमाणे तुझा पत्ता तयार कर व लिही.

..........................................................................................


..........................................................................................

स्वतः Self मदत Help

# भेटकार्ड

**शिक्षकदिना निमित्त शिक्षकांना शुभेच्छा संदेश देणारे भेटकार्ड तयार कर.**

**उपक्रम : मी पाहिलेला अपघात या प्रसंगाचे वर्णन कर आणि तुझ्या वहीत लिही.**


स्वतः
Self


मदत
Help

**आठवडा 12**

# सारांश लेखन

**खालील उतारा वाच आणि त्याचा एक–तृतियांश इतका सारांश लिही.**

चार माणसे शेजारी पाजारी, पारावर, शाळेत, कचेरीत, बसमध्ये, आगगाडीच्या डब्यात या ना त्या निमित्ताने थोडा वेळ जरी एकत्र जमली की, त्यांच्या बोलण्याचा, गप्पांचा आणि चर्चेचे विषय असतात इतरांच्या चुका, इतरांचे दोष व इतरांची टवाळी! म्हणजे ही एक प्रकारची परनिंदाच चाललेली असते, असे म्हणा ना! मद्याची नशा चढावी त्याप्रमाणे परनिंदेची धुंदी माणसास चढत असते. परनिंदा करणारा माणूस स्वत:च्या अंत:करणातील आणि सभोवतालच्या वातावरणातील प्रसन्नता नाहीशी करून सर्वत्र दु:खाचे, औदासीन्याचे, निराशेचे, मत्सराचे आणि द्वेषाचे वातावरण निर्माण करण्यास हातभार लावत असतो. धूर ओकणाऱ्या ज्योतीमुळे दिव्याची काच धुरकटून जाते आणि दिव्याचा पार हरपून जातो. मात्र ज्योतीची काजळी झटकली, ती मर्यादित ठेवली व दिव्यावरील काच रोज सकाळी वा संध्याकाळी स्वच्छ पुसली की प्रकाश अवती भवती लख्ख पसरतो. अंधकाराचा लोप होऊन वातावरण उजळून निघते तसेच आपण रात्री झोपण्यापूर्वी किंवा पहाटे उठण्यापूर्वी मनाच्या काचेवर सतत इतरांच्या अवगुणांच्या विचाराने जमलेली काजळी अंत:करणातील क्षमतेच्या राखेने स्वच्छ पुसली की, आपले मन दिवसभर टवटवीत राहते. जेथे आपण जाऊ तेथे प्रसन्नताच निर्माण करण्यास आपला हातभार लागेल.


स्वतः Self


मदत Help

# भावार्थ

**दिलेल्या कवितेचा अर्थ स्वतःच्या भाषेत लिही.**

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥१॥
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥२॥
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगें । काय भुललासी वरलिया रंगें ॥३॥
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥४॥

**उपक्रम : कोरोना विषाणू आणि लस यांच्यामधील संवाद तुझ्या वहीमध्ये लिही.**


स्वतः Self


मदत Help

# बातमी वाचन आणि लेखन

खालील बातमीचे वाचन कर आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.



## वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा...



**आदर्शनगर, ता. १६ :** दि.१५ ऑक्टोबर रोजी साधना विद्यालय, आदर्शनगर येथे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. आदर्शनगर परिसरातील महत्त्वाच्या चौकांत 'वाचनसंस्कृती वाचवा' या विषयावर मुलांनी पथनाट्ये सादर केली. त्याचबरोबर विद्यालयात 'उत्कृष्ट वाचन' ही स्पर्धा घेण्यात आली. यात मुलांनी त्यांच्या आवडत्या कथा, कवितांचे वाचन केले. या स्पर्धेत इयत्ता सातवीतील शेखर काजळे या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले. पुढील काळामध्ये वाचनसंस्कृती विकसित व्हावी, या दृष्टीने विद्यालयात विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे मुख्याध्यापकांनी या प्रसंगी घोषित केले. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने वाचन प्रेरणा दिन साजरा केला.

१) कोणाचा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो?

२) वरील बातमी कोणत्या तारखेची आहे ?

३) वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे ?

४) कोणत्या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षिस देण्यात आले?

५) विद्यार्थ्यांमध्ये वाचनकौशल्य वाढावे, यासाठी शाळेत कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील यावर गटचर्चा कर आणि त्याची यादी तयार कर.


६ ) तुमच्या शाळेत वाचन प्रेरणा दिन कशा प्रकारे साजरा करण्यात येतो?

स्वतः Self मदत Help

# पत्रलेखन

**कोरोना महामारीमुळे तुझी शाळा बंद आहे. त्यामुळे तु शाळेत जाऊ शकत नाही. यासाठी आरोग्य अधिकाऱ्याला लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करण्याची विनंती करणारे पत्र लिही.**

उपक्रम : तुमच्या आई–वडिलांच्या लग्नाचा १७ वा वाढदिवस जवळ आला आहे, त्यानिमित्ताने आई–वडिलांना शुभेच्छा संदेश देणारे भेटकार्ड तयार कर.



स्वतः Self



मदत Help

# प्रमाणपत्र

कुमार/कुमारी ----------------------------------------

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, --------------------------------

तालुका ------------------------, जिल्हा-----------------

याने/हिने स्वतः/ पालक/शिक्षकांच्या मदतीने कार्यानुभव पुस्तिका पूर्ण केली आहे. या कार्यानुभव पुस्तिकामधून त्याला/तिला स्वतः प्रयत्न करुन शिकण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन मिळाले आहे. प्रत्येक आठवड्यात विद्यार्थ्याने केलेल्या प्रयत्नांची माहिती खालील प्रमाणे आहे.

**आठवडा १** **आठवडा २** **आठवडा ३** **आठवडा ४**

**आठवडा ५** **आठवडा ६** **आठवडा ७** **आठवडा ८**

**आठवडा ९** **आठवडा १०** **आठवडा ११** **आठवडा १२**

____________________ ____________________

शिक्षकांची सही पालकांची सही

ठिकाण : ____________________ ठिकाण : ____________________

दिनांक : ____________________ दिनांक : ____________________

# कोरोना विषाणूचा संसर्ग झाल्याची लक्षणे (कोविड-१९)



खोकला



डोकेदुखी



ताप




श्वासोच्छवासास त्रास




घसा दुखणे

## कोरोना विषाणूचा (कोविड-१९) संसर्ग टाळण्यासाठी खबरदारी




सामाजिक अंतराचे पालन करणे.



नियमित मास्क वापरावा.



शक्यतो घरीच थांबावे. अत्यावश्यक असल्यास बाहेर पडावे.



नियमित सकस आहार घ्यावा.



शरीर तंदुरुस्त रहावे म्हणून नियमित व्यायाम करावा.



दिवसभरात भरपुर पाणी प्यावे.



आवश्यकता वाटल्यास तात्काळ डॉक्टरांना भेटावे.



नियमित स्वच्छ हात धुवावे.



आपली वेळ आल्यानंतर लसीकरण करुन घ्यावे.

+91 80 26629890
info@sikshana.org @
www.sikshana.org
# 41, K. R. Road, Basavangudi
Bengaluru – 560004, Karnataka

Sikshana FOUNDATION